# ठाणे महानगरपालिका,ठाणे.
# कोविड प्रतिबंध अंतर्गत
# कंत्राटी भरती जाहिरात

विषय : कोरोना विषाणु (कोव्हिड १९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी ठाणे महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.

कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता ठाणे महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी खालील नमुद पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन थेट मुलाखती द्वारे **(Walk In Interview )** नमुद पदसंख्येची तात्पुरती प्रारुप गुणवत्ता (Draft) यादी तयार करुन खालील नमुद पदे आवश्यकतेनुसार खालील नमुद अटींच्या अधिन राहुन प्रारुप यादीमधुन कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | मासिक ठोक एकत्रित मानधन | एकुण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | INTENSIVIST | M.D. MEDICINE | रु. २,००,०००/- | ०४ |
| २ | ज्यु. रेसिडेंट | MBBS | रु. ४५,०००/- | १० |
| ३ | वैद्यकीय अधिकारी | १.मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी<br>२.शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य / संस्थेकडील / खाजगी रुग्णालयाकडील संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधन्य. | रु.६०,०००/- | २२६ |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेदीक) | १.शासनमान्य विद्यापिठाची /संस्थेची आयुर्वेद शाखेची पदवी. (बी.ए.एम.एस.)<br>२.संबंधित कामाचा तीन वर्षाचा अनुभव. | रु. ४०,०००/- | १०० |
| ५ | आरोग्य निरीक्षक | इ. १२ वी पास., आरोग्य निरीक्षक / स्वच्छता निरीक्षक पदविका पास, शासकीय / निमशासकीय संस्थेतील अनुभवास प्राधान्य. | रु.२२,५००/- | ५० |
| ६ | सिस्टर इनचार्ज | १.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी ची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>२.महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>३. शासकीय/निमशासकीय आस्थापनेवर स्टाफ नर्स / नर्स मिडवाईफ म्हणून ७ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु.३५,०००/- | १५० |
| ७ | परिचारीका (जी.एन.एम.) | १.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ ची विज्ञान शाखेतील परिक्षा उत्तीर्ण.<br>२.महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदवीका.<br>३. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु.३०,०००/- | १९५ |
| ८ | प्रसाविका (ANM) | १.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा उत्तीर्ण .<br>२.शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ए.एन.एम.अभ्यासक्रम पुर्ण.<br>३.महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. २५,०००/- | ११० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | औषध निर्माण अधिकारी | १.उच्च माध्यमिक शाळांत परीक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण<br>२.औषध निर्माण शास्त्रातील पदविका (डी. फार्म)<br>३.औषध निर्माण शास्त्रातील पद्वीधर उमेदवारास प्राधान्य.<br>४.संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु.२२,५००/- | २९ |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १.मान्यताप्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र, जीवशास्त्र वा सूक्ष्मजीवशास्त्र या विषयातील पदवी.<br>२.मान्यताप्राप्त संस्थेची डी. एम.एल.टी. परीक्षा उत्तीर्ण<br>३.वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु.२०,०००/- | ६९ |
| ११ | सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान विषयातील पदवी व मान्यताप्राप्त संस्थेतील प्रयोगशाळा तंत्रज्ञ (डी. एम. एल. टी.) प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण. | रु.१८,०००/- | ५० |
| १२ | ई. सी. जी. ऑपरेटर | १.मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र या विषयांसह पदवी.<br>२.शासनमान्य संस्थेतून हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ या विषयाचे प्रशिक्षण पुर्ण.<br>३.रुग्णालयातील या कामाचा दोन वर्षाचा अनुभव. | रु.२२,५००/- | ३० |
| १३ | आया | १.इयत्ता ७ वी पास.<br>२.मराठी लिहीता / वाचता / बोलता येणे आवश्यक.<br>३.शारिरीक कष्टाची काम करण्या एवढी तब्येत सुदृढ आवश्यक. | रु. २०,०००/- | १०६ |
| १४ | वॉर्डबॉय/ परिचर | १.एस.एस.सी व एच.एस.सी. परिक्षा उतीर्ण.<br>२.शारिरीक कष्टाची काम करण्या एवढी तब्येत सुदृढ आवश्यक. | रु. २०,०००/- | २०० |
| १५ | डेटा एन्ट्री ऑपरेटर | मान्यता प्राप्त विद्यापिठाची वणिज्य /कला शाखेतील पदवी, एम.एस.सी.आय.टी. टॅली, इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि. टायपिंग कोर्स असणे आवश्यक | रु. २०,०००/- | ४६ |

उमेदवाराने खालील दिनांकास **ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालय, महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी पांचपाखाडी ठाणे, (प.) ४००६०२ येथे मुलाखतीस उपस्थित रहावे.** (Walk In Interview )

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मुलाखतीचा दिनांक** |
|---|---|---|
| **१** | **लेक्चरर, ज्यु. रेसिडेंट, वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेदीक),.** | **२२/०५/२०२०** |
| **२** | **परिचारीका GNM , प्रसाविका ANM .** | **२६/०५/२०२०** |
| **३** | **सिस्टर इंचार्ज, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी.** | **२७/०५/२०२०** |
| **४** | **वॉर्ड बॉय/परिचर.** | **२८/०५/२०२०** |
| **५** | **आरोग्य निरिक्षक, सहाय्यक प्रयोगशाळा, डेटाएॅन्ट्री ऑपरेटर.** | **२९/०५/२०२०** |
| **६** | **ई.सी.जी. ऑपरेटर, आया.** | **३०/०५/२०२०** |

**अटी व शर्ती :-**

१. सदर जाहिरात ही **प्रारुप गुणवत्ता (Draft list )** यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्या प्रमाणे **प्रारुप गुणवत्ता यादीमधुन** कंत्राटी पध्दतीने आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

२. उपरोक्त पदांकरिता कालावधी **६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत**, जे आधी घडेल तोपर्यंत.

३. क्षेत्रीय स्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरिक दृष्टया काम करण्यास सक्षम असावा.

- **इतर अटी व शर्ती :-**

१. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.

२. जिल्हा सीमा बंदी व वाहतूक बंदी विचार करता उमेदवार हा ठाणे महानगरपालिका क्षेत्रात राहणारा असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल.

३. वयोमर्यादा : खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल असेल. प्रतिसाद कमी असेल त्या पदांसाठी सदर अटी शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त साो.यांना राहील.

४. वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक राहील.

५. नियुक्त उमेदवारांना कोव्हिड-१९ रुग्णाची सेवा करणे अनिवार्य राहील.

६. सदरचे पद संपुर्णपणे कंत्राटी स्वरुपाचे आहे.

७. सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका (Objective assessment ) पध्दतीने वॉक ईन इंटरव्युद्वारे करण्यात येतील.

८. उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रांच्या छाननी नंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील, मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची संख्या खुप मोठया प्रमाणात असेल तर त्या पात्र उमेदवाराच्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार गुणवत्ता विचारात घेऊन १:२ या प्रमाणात मुलाखती घेण्यात येतील.

९. उमेदवारांची जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटचीच साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

१०. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे. याचा उल्लेख करावा.

११. अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (शासनमान्य)

१२. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (through copy ) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१३. निवड झालेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात करारनामा करुन दिल्यानंतर कंत्राटी पध्दतीने नेमणुक दिली जाईल.

१४. येणाऱ्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१५. वरील पदे हे संपुर्णपणे कंत्राटी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायमस्वरुपाची नियुक्ती मागणच्या हक्क असणार नाही.

१६. प्रारुप गुणवत्ता यादी (पॅनल) मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना ४८ तासांमध्ये रुजू होणे आवश्यक राहील.

१७. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार वैद्यकीय आरोग्य अधिकारी / विभाग प्रमुख यांना राहतील.

१८. सदर पदांना दररोज आठ तास (रुग्णालयाच्या सोईनुसार )सेवा देणे बंधनकारक असेल तथापि, पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील.

१९. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२०. बोलविलेल्या उमेदवारास नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२१. रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त साो ठाणे महानगरपालिका, ठाणे हे स्वतः कडे राखुन ठेवतील. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२२. महापालिकेच्या आस्थापनेवरील नियमित कर्मचाऱ्यांच्या लाभदायी योजना कंत्राटी कर्मचाऱ्यांना लाभ होणार नाही. तथापि शासनाच्या कोव्हिड-१९ अंतर्गत आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालयक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे दिनांक ०८/०४/२०२० च्या तरतुदीनुसार ५० लक्ष विमा योजनेचा लाभ कंत्राटी कर्मचाऱ्यांना देखील शासन अटीनुसार लागु असेल.

२३. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तण करतांना आढळल्यास, दबातंत्राचा वापर करतांना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द बातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२४. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजु होण्यापुर्वी एका महिन्याचे मानधन अमानत रक्कम म्हणुन भरावे लागेल. व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२५. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

२६. नियमित पदांची भरती झाल्यास कंत्राटी पध्दतीच्या पदांची भरती रद्द करण्यात येईल.

महापालिका आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे

## उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना
## कंत्राटी पध्दतीने कोव्हिड-१९ प्रतिबंध अंतर्गत भरती

**प्रति,**
मा. महापालिका आयुक्त साो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

उमेदवाराचा
फोटो

**विषय :-** जाहिरात क्र. -------------------------- नुसार मानधनावरील --------------------- या पदासाठी अर्ज.

**मा. महोदय,**

उपरोक्त विषयान्वये मी करार पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर ----------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असुन या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यात अर्ज सादर करीत आहे.

**आडनाव** **स्वतःचे नाव** **वडील/पतीचे नाव**

१. **संपुर्ण नाव :-** --------------------------------------------------------------------------------

२. **पत्रव्यवहाराचा पत्ता** --------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

३. **ई-मेल आय डी** -------------------------------------------------- **मोबाईल क्रमांक** -------------------

४. **जन्म तारिख :-** **दि.** / /

५. **लिंग** **पुरष/स्त्री**

६. **जात :-** -------------------

| SC | ST | OBC | VJ-A | NTC | OPEN | | |
|---|---|---|---|---|---|---|---|

**७. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल :-**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था | उतीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८. **तांत्रिक व इतर अर्हता तपशिल :-** १) ------------------------------------------------------------
२) ------------------------------------------------------------

**अनुभवाचा तपशिल :-**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असुन त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रति सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/ करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळुन आल्यास या माहितीच्या आधारे कंत्राटी भरतीच्या नोकरीवरुन कमी करण्यास पात्र राहील व त्याबाबत माझेविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

| अ.क्र. | कागदपत्रे | जोडली आहे | जोडली नाही |
|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्र | | |
| २ | अनुभवाचे प्रमाणपत्र | | |
| ३ | जात प्रमाणपत्र | | |
| ४ | अद्यायावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र | | |
| ५ | इतर कागदपत्रे | | |

स्थळ :- अर्जदाराची सही:- ---------------------------

दिनांक :- अर्जदाराचे नाव :- -------------------------